# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०७.०४.२०२०**

## जिल्हा : सातारा

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०८.०४.२०२० ते १२.०४.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३९ | ३८ | ३८ | ३९ | ४० |
| किमान तापमान (अं.से.) | २३ | २२ | २३ | २३ | २४ |
| ढग स्थिती (आकाश) | ३ | ० | १ | १ | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५७ | ५० | ५० | ५१ | ४९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २३ | १७ | २२ | २१ | २२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ८ | ६ | ५ | ४ |
| वाऱ्याची दिशा | पश्चिम.वायव्य | आग्नेय | आगेन्य | दक्षिण | दक्षिण.आग्नेय |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामानशास्त्र विभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार सातारा जिल्ह्यात दिनांक ८ एप्रिल रोजी आकाश अंशत: ढगाळ तर दिनांक ९ ते १२ पर्यंत मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३८.० ते ४०.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २२.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०४ ते ०८ कि.मी. राहील. |
| सामान्य सल्ला | | ➢ उन्हाळ्याच्या सुरवातीला फळबागेभोवती सुबाभूळ, शेवरी, मलबेरी, सुरु तसेच ग्लिरीसीडीया यांसारखी झाडे लावावीत ती वारा प्रतिरोधक म्हणून काम करतात त्यामुळे बागेचे उष्ण वाऱ्यापासून संरक्षण होते व बागेतील बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन जमिनीमध्ये ओलावा टिकून राहण्यास मदत होते.<br>➢ तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे वाढणाऱ्या बाष्पीभवणामुळे उन्हाळी पिकांना आवश्यक तेवढे पाणी द्यावे.<br>➢ शेतकऱ्यांनी नोवेल कोरोना व्हायरस या संसर्गजन्य रोगाच्या प्रसार व प्रादुर्भाव यापासून बचावासाठी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे तसेच स्वतःची काळजी घ्यावी. |
| संदेश | | ➢ सातारा जिल्ह्यात दिनांक ८ एप्रिल रोजी आकाश अंशत: ढगाळ तर दिनांक ९ ते १२ पर्यंत मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. |
| मका | वाढीची | ➢ मक्यावरील लष्करी आळी/ स्पोडोप्टेरा फ्रुजीपेरडा या आळीचा प्रादुर्भाव दिसताच प्रादुर्भाव ग्रस्त पिकावरील अंडीपुंज गोळा करून नष्ट करावेत.<br>➢ पिकामध्ये एकरी ४ या प्रमाणात कामगंध सापळे लावावेत.<br>➢ पिकामध्ये पक्षी थांबे लावावेत. |
| रब्बी ज्वारी | पक्वता | ➢ काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| भुईमुग | शेंगा पोसण्याची | ➢ उन्हाळी भुईमुगास जमिनीच्या मगदूमाप्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.<br>➢ भुईमुगावरील रस शोषणाऱ्या किडींसाठी मिथिल डिमेटॉन २५ ई.सी. १० मी.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ टिक्का रोग नियंत्रणासाठी मॅंकोझेब २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यातून फवारावे. |
| ऊस | वाढीची | ➢ सुरु हंगामी लागवड केलेल्या उस पिकाच्या लागणीस ६ ते ८ आठवडे झाले असल्यास नत्र खताचा दुसरा हप्ता |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | १०० किलो नत्र (२१७ किलो युरिया) प्रती हेक्टरी या प्रमाणात द्यावा. |
| **टोमॅटो** | वाढीची | ➢ टोमॅटोवरील फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी नोव्हॅलीरॉन १०% ई.सी. १५ मिली किंवा क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल १८.५% एस.सी. ३ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **नारळ** | वाढीची | ➢ उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी व व वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नारळ रोपांना काठीचा आधार द्यावा. |
| **आंबा** | फळधारणा | ➢ बाष्पीभवनाचा वेग वाढलेला आहे त्यामुळे जमिनीतील ओलावा कमी होऊ नये म्हणून फळझाडांच्या खाली वाळलेली पाने, तूर काड्या, उसाचे वाळलेले पाचट इ. चे आच्छादन करावे. |
| **काजू** | पक्वता | ➢ तयार झालेल्या काजू बियांची काढणी करावी. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये वाळवाव्यात आणि सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरे सावलीमध्ये बांधावीत. जनावरांना शुद्ध, स्वच्छ आणि थंड पाणी पिण्यास द्यावे.<br>➢ पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार शेळ्यांना स्ट्रँगाईल (गोलकृमी) या जंताच्या निर्मुलानाठी एप्रिल महिन्यामध्ये फेनबेन्डाझोल हे जंतनाशक द्यावे.<br>➢ उन्हाळ्याच्या सुरवातीस एप्रिल महिन्यामध्ये मेंढ्यांना देवी या रोगाची प्रतिबंधक लस टोचून घ्यावी.<br>➢ म्हशींमध्ये घर्मग्रंथी कमी असल्यामुळे घामातून त्यांच्या शरीरात उष्णतेचे उत्सर्जन होत नाही त्यामुळे म्हशींना पाण्यात डुबु द्यावे. गायीच्या अंगावर ओले कपडे किंवा गोणपाट भिजवून ते गाईच्या पाठीवर ठेवावे. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०७.०४.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**